6 FEB 2020

क्रमांक:- पोअअ/प्रअअधि/निर्णय/जाकीर हुसेनखान-०३/२०२० - 2640 अकोला, दिनांक:-

अपीलकर्ता
श्री जाकीर हुसेनखान रहेमान खान,
रा.काला चबुतरा, हुमायु रोड, बैदपुरा, अकोला.

विरुध्द उत्तरवादी
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, अकोला.

विवेचन

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नियम ३ नुसार जोडपत्र ''अ'' दिनांक ०५.११.२०१९ प्रमाणे जन माहिती अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला यांचे कडे अर्ज सादर करुन, मी दिनांक १७.११.१८ रोजी पो.स्टे.सिटी कोतवाली येथे सा.गा.क्र.२४/१८ प्रमाणे मो.नं.८८८८११४२९३ व मो.नं.९२८७०९००१० वरुन त्रस्त असल्याबाबत तक्रार दिली होती. त्या तक्रारीची कार्यवाहीबाबत दस्तऐवजसह माहिती मिळावी व मो.नं.८८८८११४२९३, ९२८७०९००१० सीडीआर ची प्रत मिळण्याबाबत विनंती केली होती.जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्या), अकोला यांनी सदरहु अर्ज कलम ६ (३) नुसार पत्र क्र.पोअअ/मा.अधि/अर्ज हस्तांतरण/जाकीर-४१८/१६८७५/२०१९ दिनांक ११.११.२०१९ अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, अकोला यांचेकडे हस्तांतरित केला होता. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ०३.०१.२०२० रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला.तो या कार्यालयास दिनांक ०४.०१.२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

अपीलकर्ता यांचे अपील अर्जावर दिनांक २२.०१.२०२० रोजी अपील सुनावणी आयोजित करण्यात आली होती. मात्र अपीलकर्ता सुनावणीस अनुपस्थित होते. त्यांना म्हणणे मांडण्याची एक संधी देण्यास्तव दिनांक ३०.०१.२०२० रोजी दुपारी ०४:०० वा. अपील सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीस हजर राहण्याबाबत सर्व संबंधीतांना पत्र क्र.२०१३/२०२० दिनांक २७.०१.२०२० अन्वये कळविण्यात आले होते. अपीलकर्ता दिनांक ३०.०१.२०२० रोजीच्या सुनावणीस उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे पोना/८३९ सोनवणे हे सुनावणीस हजर आहेत.

अपील सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांनी, ''अहवाल,समजपत्र मिळाले, सीडीआर मिळाला नाही, गैरअर्जदारावर कार्यवाही केली नाही '' असे सांगीतले. तर जन माहिती अधिकारी प्रतिनिधी यांनी, '' अर्जदार यांना चौकशी अहवाल, समजपत्राची प्रत दिनांक ०१.१०.२०१९ रोजीच पुरविलेली होती .या अर्जाचे अनुषंगाने मोबाईल

[illegible]

प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्राचे अवलोकनावरुन तसेच सुनावणीदरम्यान संबंधीतांचे युक्तीवाद ऐकुन घेतल्यानंतर असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.शवि/लि-१/केमाअ/माहिती/जाकीर हुसेन/९८३३/२०१९ दिनांक ०३.१२.२०१९ अन्वये अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती पुरविलेली आहे. सदर प्रकरणात माहिती निर्माण/GENARATE होवूनही पुरविलेली नाही असे झाल्याचे दिसत नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश:-**

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना माहिती पुरविलेली आहे.

सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

या उत्तराने आपण व्यथित होत असाल तर या अधिनियमाचे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार हे पत्र मिळाल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांच्या आत मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, भातकुली तहसिल कार्यालय परिसर, सर्किट हाउसचे बाजुला, अमरावती कॅम्प, ता.जि.अमरावती यांचेकडे द्वितीय अपील अर्ज करण्याची आपणास मुभा आहे.

(प्रशांत वाघुंडे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,अकोला.

06.02

प्रत :-

सहा.जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पो.स्टे., सिटी कोतवाली.

क्रमांकः- पोअअ/प्रअअधि/निर्णय/थोरात-०६/२०२० - 2689 अकोला, दिनांकः- 06 FEB 2020

अपीलकर्ता

श्री उमेश भिमराव थोरात ,

रा.पंचशिल नगर, खरप रोड, अकोला.

विरुध्द उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा

उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, अकोला.

विवेचन

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नियम ३ नुसार जोडपत्र ''अ'' दिनांक २७.११.२०१९ प्रमाणे सहा.जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, खदान यांचे कडे अर्ज सादर करून, श्री किशोर इंगळे यांनी ऑगस्ट २०१६ या वर्षी रिपोर्ट दिला होता.त्याची प्रत व त्यावर काय कार्यवाही केली, केलेल्या कार्यवाहीची प्रत मिळण्याबाबत विनंती केली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.०१.२०२० रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला.तो या कार्यालयास दिनांक १८.०१.२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

अर्जदार/अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी, सहा.जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०.०१.२०२० रोजी दुपारी ०४:०० वाजता आयोजित अपील सुनावणीस हजर राहण्याबाबत पत्र क्र.१७७४/२०२० दिनांक २२.०१.२०२० अन्वये कळविण्यात आले होते. अर्जदार/आपीलार्थी हे दिनांक ३०.०१.२०२० रोजी सुनावणीस उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे पोना/८३९ सोनवणे व सहा.जन माहिती अधिकारी तर्फे श्री जी.आर. चांभारे, पोलीस उपनिरीक्षक हे सुनावणीस हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्राचे अवलोकनावरून तसेच सुनावणीदरम्यान संबंधीतांचे युक्तीवाद ऐकुन घेतल्यानंतर असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.शवि/लि-१/केमाअ/माहिती/थोरात/१०४२७/२०१९ दिनांक २५.१२.२०१९ अन्वये ''तत्कालीन चौकशी अधिकारी पोउपनि/भास्कर यांनी चौकशी संबंधीत कागदपत्रे पो.स्टे.येथे जमा केले नसल्यामुळे माहिती पुरविता येवू शकत नाही '' अशी तयार केलेली माहिती दिनांक ३१.१२.२०१९ रोजी टपालव्दारे अर्जदार यांना पाठविलेली आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेशः-

जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध झाल्यास १५ दिवसात अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरवावी.

कार्यालय परिसर, सर्किट हाउसचे बाजुला, अमरावती कॅम्प, ता.जि.अमरावती यांचेकडे द्वितीय अपील अर्ज करण्याची आपणास मुभा आहे.

(प्रशांत वाघुंडे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,अकोला.

06.02.

प्रत कार्यवाहीसाठी :-

१) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,शहर विभाग, अकोला .

२/- उपरोक्त आदेशात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करून पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) सहा.जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पो.स्टे., खदान.

२/- अपीलकर्ता यांच्या दिनांक ०१.१०.२०१९ रोजीच्या जोडपत्र''अ'' प्रमाणेच्या अर्जामध्ये नमूद माहिती प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने संबंधीतास बोलावून माहिती प्राप्त करून घेवून जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास विनाविलंब पाठवावी.माहिती प्राप्त/उपलब्ध न झाल्यास तसा स्वतंत्र अहवाल संबंधीताच्या कसुरीसह या कार्यालयास पाठवावा.

क्रमांक:- पोअअ/प्रअधि/निर्णय/नवरखेडे-०७/२०२० - 2638 अकोला, दिनांक:- 6 FEB 2020

**अपीलकर्ता**

श्री राजु प्रल्हाद नवरखेडे,

बंदी क्र.सी/४१५८

पत्ता - मध्यवर्ती कारागृह, अमरावती.

**विरुध्द उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा

पोलीस उपअधीक्षक (मुख्या), अकोला.

**विवेचन**

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नियम ३ नुसार जोडपत्र ''अ'' दिनांक ११.११.२०१९ प्रमाणे सहा.जन माहिती अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला यांचेकडे अर्ज सादर करून, १) मा.कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपुर यांचे सेवेशी जा.क्र.७२१९/अमरावती मध्यवर्ती कारागृह दिनांक १०.०८.२०११ अन्वये संचित रजा अर्ज सादर केला असता पो.स्टे.अधिकारी सिव्हील लाईन, अकोला यांचेकडून रजेचे जामीनदार यांचे घरी जावुन नियमाप्रमाणे चौकशी अहवाला करीता चौकशी करण्यात आली असता चौकशी दरम्यान रजेचे जामीनदार यांचेकडून घेण्यात प्रतिज्ञापत्र(मुंद्राक) ची प्रत, जामीनदार यांचे बयाणची प्रत, घराशेजारील लोकांचे बयाणचे प्रत व गावचे पोलीस पाटील यांचा दाखलाची छायांकित प्रमाणित प्रत मिळण्यास विनंती आहे.२) जा.क्र.७२१९/अमरावती मध्यवर्ती कारागृह दिनांक १०.०८.२०११ अन्वये संचित रजा चौकशी अहवाल सादर करणेबाबत अमरावती मध्यवर्ती कारागृह यांचे मार्फत दिनांक १०.०८.२०११ ते १०.०२.२०१२ या कालावधीत आपले कार्यालयाला प्राप्त असलेले विनंती अर्जाचे व स्मरणपत्राचे जावक क्रमांक लेखी स्वरुपात देण्यात यावे.३) जा.क्र.७२१९/अमरावती मध्यवर्ती कारागृह दिनांक १०.०८.२०११ अन्वये मा.कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपुर यांना योग्य कार्यवाहीस्तव सादर करण्यात आलेल्या संचित रजा चौकशी अहवालाप्रमाणे रजेचे जामीनदार यांचे बयाणाची प्रत मुळ अहवालची प्रत व सादर करण्यात आलेल्या संचित रजा चौकशी अहवालची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत विनंती केली होती. अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली नाही म्हणून दिनांक २२.१२.२०१९ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला.तो या कार्यालयास दिनांक २२.०१.२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

अर्जदार/अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी, सहा.जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०.०१.२०२० रोजी दुपारी ०४:०० वाजता आयोजित अपील सुनावणीस हजर राहण्याबाबत पत्र क्र.१८९७/२०२० दिनांक २४.०१.२०२० अन्वये कळविण्यात आले होते. अर्जदार/अपीलार्थी हे दिनांक ३०.०१.२०२० रोजी सुनावणीस अनुपस्थित आहेत. श्री शिवाजी पाटील, जन माहिती अधिकारी व सहा.जन माहिती अधिकारी तर्फे प्रतिनिधी मोहवा/१२५ अनिता टेकाम सुनावणीस हजर आहेत.

अपील सुनावणी दरम्यान सहा.जन माहिती अधिकारी प्रतिनिधी यांनी, '' अर्जदार यांनी मागणी केलेल्या कालावधीतील माहिती पत्र क्र.स्थागुशा/नाश अभिलेख/ब रेकॉर्ड/१०६/२०१८ दिनांक ११.०१.२०१८ अन्वये नाश करण्यात आलेली असल्याने माहिती पुरविणे शक्य नाही असे जन माहिती अधिकारी यांना पत्र क्र.३५१५/१९

सुध्दा दिनांक १९.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती नाश करण्यात आल्याबाबत कळविण्यात आले आहे'' अशी तयार केलेली माहिती टपाल स्वर यांचे हस्ते मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे पाठविलेली आहे '' असे सांगीतले.

प्रस्तुत अपीलाच्या संदर्भातील कागदपत्राचे अवलोकनावरून तसेच अपील सुनावणी दरम्यान संबंधीतांचे युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर असे दिसुन येते की,जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. पोअअ/माअधि/निर्णय/नवरखेडे-४९८/२०१९-१८८१६ दिनाक १९.१२.२०१९ अन्वयेची माहिती टपाल स्वर यांचे हस्ते मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे पाठविण्यात आलेली असुन दिनांक २१.१२.२०१९ रोजी मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे स्विकारलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली नाही असे अपील अर्जात नमूद केलेले आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश:-</u>**

अपीलकर्ता सुनावणीस अनुपस्थित आहेत.प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्राचे गुणवत्तेवर आदेश पारित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी पाठविलेल्या माहिती/निर्णयाची प्रमाणित प्रत अपील आदेशासोबत पुरविण्यात येत आहे.

सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

या उत्तराने आपण व्यथित होत असाल तर या अधिनियमाचे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार हे पत्र मिळाल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांच्या आत मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे व्दितीय अपील अर्ज करण्याची आपणास मुभा आहे.

(प्रशांत बाघुंडे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
06.02. अपर पोलीस अधीक्षक,अकोला.

प्रत :-

सहा.जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, अकोला.

क्रमांक:- पोअअ/प्रअअधि/निर्णय/गोमासे-०८/२०२० - 2657 — अकोला, दिनांक- 6 FEB 2020

अपीलकर्ता
श्री दादाराव भिमराव गोमासे,
रा.वडद बु. ता.जि.अकोला.
विरुध्द उत्तरवादी
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
शहर विभाग, अकोला/मुर्तीजापुर.

विवेचन

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नियम ३ नुसार जोडपत्र ''अ'' दिनांक १९.१२.२०१९ प्रमाणे जन माहिती अधिकारी,पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला यांचे कडे अर्ज सादर करुन, अवैध सावकारी व्यवहारात फसलेली शेती परत मिळवून देवून महाराष्ट्र सावकारी (नियमन) २०१४ अन्वये व शासकिय नियम तसेच भा.दं.वि.कलम नुसार अवैध/वैध सावकार यांचेसह गैरअर्जदारावर कठोर कायदेशीर कारवाई करणेबाबतचा तक्रार अर्ज दिनांक ०२.०७.२०१९ व दिनांक ०९.१०.२०१९ नुसार केलेली कार्यवाही व कारवाई त्यानुसार चा प्राप्त चौकशी अहवालासह तत्संबंधीत संपूर्ण कागदपत्राच्या छायाप्रतीसह मिळण्याबाबत विनंती केली होती. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्या), अकोला यांनी सदरहु अर्ज कलम ६ (३) नुसार पत्र क्र.पोअअ/मा.अधि/अर्ज हस्तांतरण/गोमासे-४८९/११९०५/२०१९ दिनांक २४.१२.२०१९ अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, अकोला/मुर्तीजापुर यांचेकडे हस्तांतरित केला होता.जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.०१.२०२० रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला.तो या कार्यालयास दिनांक २३.०१.२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

अर्जदार/अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी, सहा.जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०.०१.२०२० रोजी दुपारी ०४:०० वाजता आयोजित अपील सुनावणीस हजर राहण्याबाबत पत्र क्र.१८९६/२०२० दिनांक २४.०१.२०२० अन्वये कळविण्यात आले होते. अर्जदार/अपीलार्थी हे दिनांक ३०.०१.२०२० रोजी सुनावणीस उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, अकोला तर्फे पोना/८३९ सोनवणे व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मुर्तीजापुर तर्फे कश्रेलि/मानेवाघ तसेच सहा. जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पो.स्टे., खदान तर्फे पोउपनि/जी.आर.चांभारे व सहा.जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पो.स्टे., बोरगाव मंजू तर्फे सपोउपनि/६९१ मोहन खंडारे हे सुनावणीस हजर आहेत.

तक्रार अर्ज चौकशी संबंधीत माहिती पत्र क्र.३४८/२०२० दिनांक २३.०१.२०२० अन्वये टपालद्वारे अर्जदार यांना पाठविण्यात आली होती'' असे सांगीतले. तर जन माहिती अधिकारी , शहर विभाग, अकोला यांचे प्रतिनिधी यांनी,'' अर्ज चौकशी सुरु असल्यामुळे माहिती देणे शक्य नाही असे पत्र क्र.२३८/२०२० दिनांक १४.०१.२०२० अन्वये अर्जदार यांना कळविण्यात आले होते.सद्यस्थितीत चौकशी पूर्ण झाली असल्याने संबंधीत कागदपत्र सोबत आणले आहेत'' असे सांगीतले.

प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्र व अपीलकर्ता यांच्या लेखी युक्तीवादाचे अवलोकनावरुन तसेच सुनावणीदरम्यान संबंधीतांचे युक्तीवाद ऐकुन घेतल्यानंतर असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी, मुर्तीजापुर यांनी पत्र क्र.उपविपोअधि/मुवि/केमाअ-१२६-दादाराव गोमासे/२०२०-३४८ दिनांक २३.०१.२०२० अन्वये अर्जदार यांना विहित मुदतीत माहिती पुरविली आहे. तर जन माहिती अधिकारी, शहर विभाग, अकोला यांनी पत्र क्र.शवि/लि-१/केमाअ/माहिती/गोमासे/२३८/२०२० दिनांक १४.०१.२०२० अन्वये चौकशी सुरु असल्यामुळे माहिती पुरवू शकत नाही असे अर्जदार यांना विहित मुदतीत कळविलेले होते. सद्यस्थितीत पो.स्टे.खदान येथे सुरु असलेली चौकशी संपलेली आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश:-

अपीलकर्ता यांना पो.स्टे.खदान यांचेकडील चौकशी संबंधीत माहिती/कागदपत्र अपील सुनावणी दरम्यान पुरविण्यात आले.

सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

या उत्तराने आपण व्यथित होत असाल तर या अधिनियमाचे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार हे पत्र मिळाल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांच्या आत मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, भातकुली तहसिल कार्यालय परिसर, सर्किट हाउसचे बाजुला, अमरावती कॅम्प, ता.जि.अमरावती यांचेकडे द्वितीय अपील अर्ज करण्याची आपणास मुभा आहे.

6 FEB 2020

(प्रशांत वाघुंडे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,अकोला.

प्रत :-

सहा.जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पो.स्टे., खदान/बोरगाव मंजू.